| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>मो.क्र.9819208279 | स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० |
| --- | --- | --- |


**प्रेसनोट** **दिनांक ११.११.२०२४**

# ''ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान ठाणे पोलीस आयुक्तालयाची धडक कारवाई''

आगामी सार्वत्रिक निवडणुका २०२४ शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात मा.पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे यांच्या आदेशान्वये व मा.पोलीस सह आयुक्त श्री.डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०९.११.२०२४ रोजी रात्रौ ११:०० ते दिनांक १०. ११.२०२४ रोजी पहाटे ०२:०० वाजेपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. सदर ऑल आऊट ऑपरेशनमध्ये परिमंडळ १,२,३,४ व ५, गुन्हे शाखा, वाहतूक शाखा मधील ३१२ पोलीस अधिकारी व १२८८ पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला.

- ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान शस्त्र अधिनियम अंतर्गत ३१ गावठी कट्टे, ७ कोयते व ५ तलवारी असे एकुण ४३ हत्यारे हस्तगत करून एकुण ४१ गुन्हेगारांना अटक करण्यात आली. अवैध दारूचे एकुण ५७ गुन्हे दाखल करून रू.५,०७,४८४/-ची अवैध दारू जप्त करून एकुण १८५ आरोपींवर कारवाई करण्यात आली.
- तंबाखूजन्य पदार्थाच्या अनुषंगाने कोटपा कायदयान्वये १७९ जणांवर कारवाई करण्यात आली.
- सदर ऑपरेशन दरम्यान ७४ हॉटेल, ६४ लॉज, ३९ बियर बार, ४२ डान्स बार व इतर आस्थापनांची तपासणी कारवाई करण्यात आली.
- रेकॉर्डवरील ५९ हिस्ट्रीशिटर, ५० तडीपार, ३१ गुंड असे एकुण १४० सराईत गुन्हेगार यांची तपासणी करून झाडाझडती घेण्यात आली, त्यावेळी ४७ तडीपार गुंड मिळून आल्याने त्यांचेविरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे वेगवेगळया पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदवून त्यांना अटक करण्यात आली.
- अंमलीपदार्थ विरोधी कारवाईचे देखील आयोजन करण्यात आले होते. त्या कारवाईत अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्या एकुण १५ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूध्द गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात आली.
- सदर ऑपरेशन दरम्यान १,८५,२२० रूपये किंमतीचे अवैध शस्त्र व ५,०७,४८४/-रूपये किंमतीची अवैध दारू असा एकुण ६,९२,७०४/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
- ठाणे पोलीस आयुक्तालयात वाहतूक शाखेकडून एकुण १२१० लहान/मोठे वाहने तपासण्यात आली. दरम्यान मोटर वाहन कायदयान्वये २१४९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून एकुण १८,५८,७५०/- रूपये दंड आकारण्यात आला.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर